म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. 2826

हे अंतर्मन
हे अंतर्मन भविष्य / अनंत विश्वाच्या आपतीत
सूर्यमालेला
थिरथिर
हे अनंत प्रकाशवर्षांचे अंतर
हा अयोग विश्वात
तुझा
माझा
सगळ्यांचा जन्ममृत्यु
सारंच जन्मातीत ओतप्रोत

संग्रह /

REFBK-0023117
REFBK-0023117

संदर्भ

संग्रह


# मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

( क्रु. मा. प. )
५०००-४-८०

काव्य
२४२६
23996
संदर्भ शाखा
६/3/८9

# संग्रह

अनिल बांदेकर

REFBK-0023117
REFBK-0023117

ऋचा

ऋचा प्रकाशन : २

प्रकाशन-दिनांक : ३ मे १९७९

© १९७९, विजया बांदेकर

संपादन : वासंती मुझुमदार

मुखपृष्ठ : वासंती मुझुमदार

मुखपृष्ठावरील अक्षरे : अनिल बांदेकर

मांडणी : अशोक शहाणे

मुद्रण :
प्र. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
गिरगाव, मुंबई ४०० ००४

मुखपृष्ठावरील कवितेचे मुद्रण :
क्रोमो प्रिंट्स
ॲक्मे इंडस्ट्रियल इस्टेट
शिवडी, मुंबई ४०० ०१५

प्रकाशन :
अरुंधती पानसे
ऋचा प्रकाशन
सोनोरी, ३६ चरई
ठाणे ४०० ६०१

किंमत : १० रुपये

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
काव्य
दा. क्र. २३९९०
२४२६
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

तुझं तुलाच—

## प्रार्थना

हे महन्मङ्गल, महाकार स्तिमित अस्मिते,
अंधारातही पाहण्याची अंगी शक्ती दे डोळयांच्या.
हे प्रकाशावर विसंबून राहणं नको;
पांघर अंगावर गर्द, जाड कातडी
मग काटे-झाडांची प्रीती नको;
वाहू देत
नसा-धमन्यांतून कण्या-कातडीतून
तुझा स्पर्श सृजनशील.
दिसू देत
एक तरी उल्काप्रपात
सांधणारा
तुझ्यामाझ्यातलं अंतर
आकाशात अधांतर;
: पावू देत प्रसरण माझ्या जाणिवेचे स्पर्शपरीघ :
होऊ देत
एकमेकांच्या अगतिक गतीतले समांतर फरक स्थगित;
दे
मला माझी सूर्यमंडल भेदणारी
प्रवेग-प्रत्यंचा
परते कर
माझे पद्मासनस्थ प्रत्यय पुन्हा

एरवी
निराधार ठरतील घेतलेले फांद्यांचे आधार
अव्याकृत अस्तित्वाच्या दर्शनाकरिता
निरर्थक ना ठरोत आजवर केलेल्या
स्वरव्यञ्जनांनी युक्त
माझ्या पुनरुक्त प्रार्थना !

## अर्घ्य : १४ मार्च १९७९ करिता

आइन्स्टाइन, तू सापेक्ष-सिद्धांती

ते दिक्कालस्थ कारण
ते निष्पंदातलं स्पंदन
तो निराकाराचा आकार
हे सापेक्ष आद्यंत
आइन्स्टाइन, तुझे

पण ते दिक्कालस्थ कारण
हे निष्पंदातलं स्पंदन
आणि हा निराकाराचा आकार
हे नेमस्त जाणलंस
आइन्स्टाइन, तूच फक्त

तू तुम्ही मी आम्ही
आम्ही कृतकर्मांना बांधिल,
साद्यंत आम्ही तो यमाचे पूजक
हेही जाणलंस फक्त तूच.

तूच दिलास कानमंत्र
: आंधळयास दृष्टी नसते
दृष्टिहीनास दिशा नसतात
: मृतास आत्मा नसतो
मृतात्म्यास दिशा नसतात

हे थोर द्रष्ट्या!
घे स्वीकार हे अर्घ्य
एका अंध मृतात्म्याचे
आइन्स्टाइन, तू स्वीकार
हे अर्घ्य एका मृतांधात्म्याचे.

## पाऊस

बिनसावल्यांच्या उजेडातनं ये
खोटा पैसा भिजवून ये पोरांचा
बोळातल्या. ये माझ्या
मनातल्या व्यभिचारी
भावनेतनं
पिऊन
कफ

पूस
अस्पष्ट
आरसेपानं
डोळ्यांदेखता कलतं
फटीला निमित्तदार, त्यातनं
ये माझ्यावर. तुडव मला असा पाय न
वाजवता. साता-समुद्रांतल्या नंग्या खलाशांबरोबर.

ये.
चिंब
ओलसर
चिमणीच्या चोचीत.
ये कोरडा तारेवर हवास तर
पण माळरानावरचा पक्षी-आंसूस-डोळा...
त्याला मोत्यांत मढवून ये
ढीगढीग मोत्यांत
मढवून ये

## २६ × ६ × ७५

अस्तंगत आकाशातून अचानक
जेव्हा कोसळल्या मुसळधारा
आधीच ओस पडलेल्या हमरस्त्यांना
जमावबंदी जारी झाली.
रहदारीला खुले असलेले
हे लांबरुंद हमरस्ते
आम जनतेसाठी आता बंद

खरं तर माझ्यादेखत माझ्या
देशाच्या आकाशाला कधीच नव्हती
सूर्योदयासारखी पूर्वदिशा
अशा दशेत
आता अवतीभवती कोसळत मुसळधारांनी,
रोखल्यात लोकांवर धारदार संगिनी आपल्याच आपल्या
उभारल्या बॅरिकेट्स
गिलोटीनची ब्लेड्स व आसूडांचा कडकडाट
अलिप्त आकाशात.

आपण हे सगळंच सोसत
निपचित, चौकाचौकात मख्ख पुतळ्यासारखे
माणसाचे कठडे झालेत
राजमार्गावरच रंगलेला तमाशा बघण्यात दंग
पहात हजारो हिजड्यांच्या रॅलीज
जवळून जातयेत.
आणि वहात जाणाऱ्या फूटपाथवरनं
गांडूंच्या फॅशन परेड्स
युनिसेक्स कपडे अंगी चढवूनही

ज्यांनी मानेवर ओझीच वाहिली पुरातन डोक्यांची,
भ्रामक प्रतिमांसारखे आरशातले
जिणे टाकून देणे ज्यांना कधी जमलेच नाही.

मधूनच भेटत गेले फक्त पुराण्या इतिहासाचे
पवाडे गात फिरणारे वाघ्यामुरळी,
किंवा पहात असे कित्येक पुरुषसिंह
ज्यांच्या गर्जना विरल्या गळयातल्या गळयात
गिरक्या घेऊन
आणि वरून कोसळत राहिला पाऊस मुसळधारांनी.

कदाचित
आता आहोत तिथूनच, लागेल
शहरं वजा जाता उरलेल्या वस्त्यांत जागून
गस्त घालावी
आदिम अंधारालाही आठवून उद्घोष प्रकाशाचा

कदाचित
उद्याचा सूर्य उगवण्यापूर्वीच करावी लागेल मुक्रर
या देशाच्या आकाशाची पूर्वदिशा
वाटांनाच व्हावं लागेल भूमिगत
एकटं सोडून राजरस्त्यांना
एकटंच कदाचित

कधीही न उगवत्या सूर्यासाठी ह्या इथूनच
सुरू झाल्यात वाटा भूमिगत
कोसळत्या धारांत भिजायला धजावून
कदाचित या आदिम रात्रीतून
प्रकाश शोधायला माझ्या देशाच्या
अस्तंगत आकाशातून.

**पक्षी**

नास्तित्व माझं जन्मा आलं
तेव्हा
वारा वाहिला मृगजळ होऊन
जिवती गेली तशीच निघून
नशीब काढायला जागा शोधून
येत्ये म्हणून.

काय करू
मला हात नाहीत पाय नाहीत
डोळे नाहीत कान नाहीत
माझे पंख असे कातरलेले
तरी
तू आहेस आला उभ्याउभ्या
झिजव नातं ना कळता
दुरावा मालव जळता जाळता
लुटून घे उभट सुख
कारण :
बसायला इथं वाव नाही.

काय करू
रूढ येऊन
गेली देऊन
बेताण पाळणा
दोरी रिती माझ्या हाती

त्यावर जगताहेत इतर जगून
तर कातरल्या पंखांत
पाठकोर जिणं दे जगू

**बारा**

## जन्म

गर्भरेशमी दिवस
असेच काढले डोळयांवर
जार पांघरून
ओटी-पोटांत.

सुभाषबाबू चल बसे
बोले किसी ऐक्सिडंट में
हे न्
ह्या वेळी पिशवी काढून घ्यायची
असंच काही तरी ऐकलं
ते ह्याच झोपेत बाहेरून
एका तोंडून.

जाग आल्यावर आढळलं:
नाळ तुटलीय
नातं सुटलंय
समोर उभ्या दहा दिशा
न् भविष्याचा विटका वसा

तर एकूण आपला जन्म झालाय
दिशाहीन स्वप्नाचा जन्म झालाय
एकाकी

## तू तिथे जाण्याआधी

तू तिथे जाण्याआधी,
इथून कितीएक योजने दूर
माध्यान्ह रात्र जिथे पसरली
एक आरण्य आदिवासात

तिथल्या प्रेषितांचे पाय मातीचे
खडावा मातीच्या
ज्या चढवाव्या लागतील
तुला,
हे अंधारयात्रिका !

त्याआधी,
आजवरच्या इतिहासाचे
जाड बाड
गाड इथल्या
वेशीवरल्या तटबंदीत
गोठव
त्वचेच्या स्तरावरचे
वरवरचे जगणे
इथल्या
भासांच्या दिवसरात्रीत

तो आरण्य आदिवास
तिथे सुरू होतो
जिथे हे शहर असेल संपलेले,
मातीत राबून रापलेले
असंख्य हात मातीचे
पसरलेले तुझ्या स्वागताला

इथल्या संदर्भहीन थव्यांत
हरवल्या सावल्या त्यांच्यात
पुन्हा गवसतील तुला
तिथे
जिथे हे शहर असेल संपलेले.

इथल्या अलंकृत अश्रूंहून
प्रचंड असतील धारांचे आवाज
तिथल्या कसून कोसळणाऱ्या घामाचे
इथल्या दिमाखी दुःखांहून
असह्य भार जमेल तुझ्या डोळ्यांत भरभरून
तेव्हा उकल तुझे संस्कारित डोळे श्वासाच्या विरोधात
कारण, तिथल्या हुंदक्यांना तुझ्या श्वासांचे आधार

अपुरी पडेल इथली शिदोरी
कदाचित त्या काजळकुंद रात्रीत
की कुरतडून स्वतःची आतडी
भूक भागव, तहान भागव
आटवून स्वतःच्या रक्तपेशी
तरच तिथल्या अनादी हुंदक्यांतून
आकारेल एक निश्चयी आरण्यगाणे
तिथले अंधारगडद पडदे दूर सरतील
दडलेले सूर्य तू जागवल्यानंतर
एका आरण्य आदिवासात.

त्याआधी
तुझे पाय हवेत मातीचे
तिथल्या प्रेषितांसारखे
दडलेले सूर्य तू जागवण्याआधी.

## मुक्काम पाथर्डी/वैताग शके १८९५

इथल्या गुराढोराची रक्तबंबाळ हाडे हाडे
थवे थवे थवथवलेली धड गिधाडे,
इथली माती,
कणाकणाला तडे,
रक्तपेशींचा, हाडामांसाचा, निसूनपिसून हा आटापिटा,
पहा, माणूस म्हणून जगतानाचे हे खडे सांगाडे.
इथली माती, कणाकणाला तडे.
सुकून कोरड्या खट्ट नद्यानाल्यांच्या
पात्रापात्रांतून तप्त तृप्त वाळूच्या घाटदार मधल्या धारा
दिवसाढवळ्या विस्कटून धावणारा लवणवारा.
(शेराबाभळीच्या ऊसमळयांच्या गप्पा सोडल्या राव!)
तर इथे बेपत्ता हिर्व्या लकेरी!
ह्या चित्रातल्या वांझ आकाशी तुरळक अश्रुधूर
न् त्याची तटस्थ धग.
आवाज चिळीमिळी चूप. चिटपाखराचा पत्ता नाही.
सुकल्या गालांवर सुकडीची लाली मिरवत
इथल्या वठल्या दिवसरात्री.
त्यांना गाठ पडली नाही, एकही गुमास्ता गाभण ढग
इथे नुसती तटस्थ धग
ह्या चित्रातली सगळी क्रियापदं गायब
त्यांना चालवायला धनी नाही.
हे चित्र शके १८९५ वैताग शके १८९५
'ऐ मेरे दोस्तों प्रिय साथियों,
आहे कुणी सखीचा लाल यार दिलदार?'
ह्या चित्राचा खिळा न् खिळा उस्कटून
उखडा चौकट
ठेवा चित्रातला रंग रंग पालटून
करा हरेक खिळा खिळखिळा.
उखडा चौकट ठेवा चित्रातला रंग न् रंग पालटून
हे चित्र शके १८९५ वैताग शके १८९५

## देणं

देणं
तुझं तुलाच देतोय.

छातीभर धूर भरून
विड्यांकडे पाह्यलं
तेव्हा
पैशे मोजले तुमच्या आठवणींचे
जे
कधीच परते करता नाहीयेत
ते फेडण्यातच जगतोय मी
त्याच विडीच्या वळकटीत
झटकत स्वतःची राख
रिकाम्या रक्षापात्रात

## हे असंख्य हात

हे असंख्य हात साचेबंद
उंचावलेले, निरभ्र आकाशाकडे फूल धरून
असंख्य झडलेल्या बोटांनी, हातांनी
ऊन-वाऱ्याला न डगमगता
म्हणताहेत एक अदृश्य उगमस्थान
उसळतंय त्यांच्या निष्कलंक तळव्यातून
म्हणताहेत, हा अंतःस्थ मूलस्रोत
सहस्र गुरांना संजीवनी,
अन् अगणित टोळया, भटक्या जमाती
प्रत्येक गावकुसाबाहेर भटकणाऱ्या
झडलेल्या बोटांचे हे हात, मूलस्रोतातून उचंबळून
साचेबंद, आकाश सुशोभणारे,
शहरकाठीची आसपास जेव्हा अजूनही
हिरवीगार होती जशी चंद्रकिरणं जंगलातून डोकावताहेत
ह्या गुहेत तुम्ही शिरा, जिथून हे आलेत,
तुम्ही जर मूळ शोधलंत
ह्या रोगाचं,
ज्यानं ह्या हातांना उद्ध्वस्त केलंय

(संध्याछायेपेक्षा गडद आच्छादन)
अन् पहाटेपेक्षा अंधारलेली
पण मला माहीत आहे त्यापेक्षा जास्त तुम्ही
हुडकू शकणार नाहीत.
मातीचं रक्त, दगडाचा घाम
जे एकत्र ह्या तळव्यातून वाहतंय
ह्यांची बोटं झडलीयेत
न् सूर्यफुलं रोवलीत त्यांच्या हाताला
मला दिसतंय

हे असंख्य हात निष्क्रीय, गावकुसाबाहेरचे
भटकणारे हात
ह्याच हातांनी सोनकमळं उधळली
कोण्या काळी

गरम शिशाचा घोट
रिचवूनही तुम्हांला क्वचितच वळेल
यांनीच पाहिल्या पहिल्या टोळ्या
वस्तीकडे वळताना
...आवंढे गिळून पडलेल्या शिळांना
वाचा फुटली

## हे असंख्य हात

हे असंख्य हात साचेबंद
उंचावलेले, निरभ्र आकाशाकडे फूल धरून
असंख्य झडलेल्या बोटांनी, हातांनी
ऊन-वाऱ्याला न डगमगता
म्हणताहेत एक अदृश्य उगमस्थान
उसळतंय त्यांच्या निष्कलंक तळव्यातून
म्हणताहेत, हा अंतःस्थ मूलस्रोत
सहस्र गुरांना संजीवनी,
अन् अगणित टोळ्या, भटक्या जमाती
प्रत्येक गावकुसाबाहेर भटकणाऱ्या
झडलेल्या बोटांचे हे हात, मूलस्रोतातून उचंबळून
साचेबंद, आकाश सुशोभणारे,
शहरकाठीची आसपास जेव्हा अजूनही
हिरवीगार होती जशी चंद्रकिरणं जंगलातून डोकावताहेत.
ह्या गुहेत तुम्ही शिरा, जिथून हे आलेत,
तुम्ही जर मूळ शोधलंत
ह्या रोगाचं,
ज्यानं ह्या हातांना उद्ध्वस्त केलंय

(संध्याछायेपेक्षा गडद आच्छादन)
अन् पहाटेपेक्षा अंधारलेली
पण मला माहीत आहे त्यापेक्षा जास्त तुम्ही
हुडकू शकणार नाहीत.
मातीचं रक्त, दगडाचा घाम
जे एकत्र ह्या तळव्यातून वाहतंय
ह्यांची बोटं झडलीयेत
न् सूर्यफुलं रोवलीत त्यांच्या हाताला
मला दिसतंय

हे असंख्य हात निष्क्रीय, गावकुसाबाहेरचे
भटकणारे हात
ह्याच हातांनी सोनकमळं उधळली
कोण्या काळी

गरम शिशाचा घोट
रिचवूनही तुम्हांला क्वचितच वळेल
यांनीच पाहिल्या पहिल्या टोळ्या
वस्तीकडे वळताना
...आवंढे गिळून पडलेल्या शिळांना
वाचा फुटली

## दुपार

माथ्यावर सूर्य दुखरा.

अशा वेळी कुठे तरी
चुल्ह्यातली आग काढते माग
करपल्या धुराड्यात अन् थंडावतो पोट-निखारा

वळचणीत चिमणी
धापावून घेते मिटून अर्धे डोळे
पहात आकाशस्थ स्वंथ निळे

अंगणात झाड
शोधतं आपली लांब सावली
पायाखाली पाचोळयात स्वतःहून हरवलेली.

गप्प दुपार : सुस्त ओंडका
अशा वेळी कुठे तरी
होवो आतड्याचा चोथा—म्हणत
मी चाळून होतो मोकळा
माझ्यातल्या माणसाला
माणसातल्या माकडाला
बनारसी पान

## पूजा

एक उंदीर येतो कधी
दिवेलागणीची वेळ काढून
देवघरात बिळातून

पाडून हवे तितके देव
विठोबासुद्धा
नेतो अन्
पिंडीच्या टाळूवरचे तांदूळ
दोनचार रेशनचे—बिनबोभाट

मी करीत बसतो कल्पना
बिळात तो कसा दिसत असेल
बिळातून मी कसा दिसत असेन
बिळ आतून कसं दिसत असेल

पूजा सोडून
एकाग्र...

# अजून तो निजून आहे

तुमच्या
कॉंक्रीटच्या उभ्या जंगलातून
वाट तुडवताना नखशिखान्त
रक्तात भिजलो आम्ही. रस्त्यांनाही
डांबरी घाम फुटावा दरदरून
असे वणवण पायी फिरलो
पोटापाण्याच्या शोधात.
दारोदार. उद्याचे आधार. असे निराधार.

ह्या रस्त्यातल्या खांबांना विचारा.

टेरीलीनच्या फडक्यात गुंडाळून
ठेवलीत, गाडून टाकलीत तुम्ही
माणसामाणसांतली नातीगोती.
पण तुमच्या वासनांच्या कवाडांना
बरीक फटी असतात.
त्यातनंच दिसत असतात तुमचे
नीतिनियमांचे फुटके फलक. ऐकू येतात
तुमच्या चिरकत्या घोषणा.

आमचा सगळा डाव
सदा खुल्लम् खुल्ला
ह्या रस्त्यांना विचारा.

सिनेमा-टी. व्ही.च्या ताणबंद पडद्यावरही
हे सगळं पाहता तुम्ही
अंधार गुडुप्प बसून गप्प शेजारी शेजारी
मात्र
फिल्म तुटली की, दिवे गेले की,
शिट्ट्या मारता
पिटात बसून मनातल्या मनात तरीही
तुमच्या रेम्या डोक्यात कधी उजेड पडत नाही
की वास्तविक
आमच्या घामाचा वास तुमच्या मातीला

त्या पडद्यांना विचारा
(आम्ही काही वेगळं सांगत नाही)
की तुमचंच सांडपाणी जिरतंय
आमच्या गोणपाट गोधड्यांखाली
चार चाकांचा धुराळा साचतोय
आमच्या अंगोपांगांवर
(ती धूळ झटकून आता उठायचंय)
दरसाल कोसळणाऱ्या खाचाखळग्यांतून
चिखल उडवला अंगभर तुमच्या भरधाव चाकांनी
भेलकांडल्या तिरिमिरी आमच्या आशाआकांक्षा
तेव्हा डोळ्यातल्या चिखल गाळाने
(आताच्या पाणकळ्यात हे असं चालायचं नाही)

त्या पडद्यांना विचारा.
माणुसकीची कात विकून जगणारे बेशरम तुम्ही
तुमची संख्या मोजू घातलीत तर
अपुरी पडतील आमची लक्षावधी बोटं
वास्तविक उन्हाच्या नुस्त्या झळीनं
करपते कातडी तुमचे रंग पालटतात
चेहरेमोहरे दांभिक भडव्यांनो !
विचारा ह्या झाडाझुडपांना

अरे, करुणाकर गौतमाच्याही पोटात
निद्रिस्त असतो ज्वालामुखी, हे जरा ध्यानात घ्या.

अजून तो निजून आहे
निजून आहेत अजून येणारे पहाटचे पाळीवाले
त्यांना जरा जाग येऊ द्या
(तुमच्या आयाबहिणींच्या पदराचं पोत टिकू द्यात)
चुकू द्या तुमच्या छातीचे ठोक्यांचे ठेके
मानवी संस्कृतीच्या मानभावी ठेकेदारांनो !

पहाटचे पाळीवाले अजून निजून आहेत
ते जरा जागे होऊ द्या

अजून तो निजून आहे
तो जरा जागा होऊ द्या

## पूर्वजांतला अंधार

तसा प्रत्येकच असतो जोपासत
आपल्या पूर्वजांतला अंधार
जशी रोजच मावळती दिवसते
दिवस मावळतो अंगाशी अंधार जपत.

जे ज्ञानी असतात
ते जाणून असतात
अवैध अंधाराचं महात्म्य
ते केवळ सूर्यस्वप्न
उराशिराशी नाच नाच नाचतात
किंवा
जे आसन्नमरण मरणोन्मुख
भूतसन्मुख
ज्यांचं वांझ उरकेल होमहवन
नवसनैवेद्य जपजाप्य
गवसत असेल अखेर लकेर
त्यांना डोळाभर
देदीप्यमान मृत्युशय्येवर

तशात तू तर सर्वज्ञ
सर्वव्यापी सर्वसाक्षी सर्वमान्य
तुझ्या रंध्ररंध्रातून कार्यरत
तुझे स्वयंभू स्वर
अनन्वित अहर्निश
अनभिषिक्त तू अपौरुषेय तुझे अस्तित्व
सफल संपूर्ण हस्तक्षेप तुझे
तुला सूर्यस्पर्शाची गरज नाही.

मला हे मान्य नाही काहीवाही
वेळ नाही
जपायला माझ्या पूर्वजांतला अंधार
जरी माझेही पूर्वज असतील अंधारमय
खोलवर रुजलीत
मीपणात माझ्या अस्तित्वाची पाळेमुळे
अंतर्मुख माझे डोळे माझी बुबुळे
योगभ्रष्ट मी तरी
एकाकी एकमेव
मला सूर्यस्पर्शाची गरज नाही
वेळ नाही जपायला
मला पूर्वजांतला अंधार

## टाळी

माझ्यातल्या भूताला
एकदा मी विचारलं
तुझ्या थडग्यावर
गवत जर उगवलं
मुळं रक्त धरू लागली
तर काय करशील ?

भूत मला म्हणालंय
हातावर टाळी देईन
दूर निघून जाईन
दूर निघून जाईन
हातावर टाळी देऊन

गवती थडगं
उगवू देत
रक्त-मुळं
धरू देत
हातावर
टाळी देत.

## अक्षर

अपूर्ण एकदा
आम्ही दोघं प्रेम करीत बसायचो
आकाशमुळांवर होतो मात्र
व्यवस्थित
खूप खूप गप्पा
गप्पाच मारल्या
एकमेकांना फूल
तिच्या डोकीतला आकडा काढला
मी गप्प असताना
त्या झाडाची मुळं कापून काढली
जेव्हा मी
होतो उलटा आणि नव्हतोही
अक्षर होतं
कापता कापता आकडा गेला उडून
पडला चिंचेखाली
नदीकाठच्या
जिथे आम्ही खूप खूप खेळत होतो
पाय रुतेपर्यंत
अन् तू-मी सर्वांचं जगणं प्रतिक्षिप्त
बऱ्याच दिवसांनंतर उजळलं अमर धाम
तिथली झाडं सहनशीलतेला सकारण
ती म्हटली आकडा घे न
हवा तर घेच
पण तितक्यात
अपूर्ण एकदा
चिंचेचा मालकच आला
मी मग म्हटलो नको
आता अक्षर आहे...

## पुस्तक वाचता वाचता

पुस्तक वाचता वाचता
इतक्या भकन् दिवे गेल्यानंतर
पुरती ओळही वाचून व्हायपूर्वी
एका शब्दावर
अडखळते नजर
मिटल्या पुस्तकात बोट तसंच ठेवून
मी क्षणभर

सगळेच अवयव, ह्या पुस्तकातल्या
बोटासकट, जागच्या जागी
डोळ्यांसकट.

खिडकीपर्यंतचा आवाका किती नकळत
न चुकता नेमका
न अडखळता,
मी पोचतो
खिडकीबाहेरच्या अंधुक देखाव्यावर
गजांच्या आडव्या रेघा
त्यातनं मला दिसतंय
अभ्राच्छादित आषाढी आकाश
बिलकुल समोरचं घर
किती प्रकर्षानं प्रथमच
अन् दोन्ही घरांतला आवाका
जाणवतोय प्रथमच.

तसा सारा गाव बुडालेला बिनाप्रकाशात

समोरच्या घराइतकंच
बिलकुल धूसर शेवग्याचं झाड, त्याच्या आड
काळ्या ठिक्कर पडलेल्या डोळ्याच्या खाचेसारख्या
समोरच्या घराच्या खिडक्या
एका छज्जाच्या वर स्टूल मोडक्या पायाचा
संडास बाथरूममधनं बाहेर पडून
थेट व्हेंटपर्यंत जाणारे पाइप खालीवर

घरापलीकडच्या रस्त्यावरनं
नेमका स्कूटरचा आवाज
दिव्याचा पट्टा सरकवत स्पष्ट
मधेच सायकलच्या घंटीचा आवाज.

जिन्याच्या खोलीला लावलेलं उघडं दार.
किती सहज सशरीर प्रत्येक अवयवानिशी
न चुकता आपण आत बाहेर
न खरचटता ना ठेचाळता दारांच्या
सताड फटीतून बिनदिक्कत

किती आंगवळणी
ही परिमिती अन् सांदीकोपरे
थेट जिन्याच्या वळणाच्या
पायऱ्या न मोजता
मधला थांबा
फिरून जिन्याखालच्या

साचल्या अंधारात लावून ठेवलेल्या
सायकलपर्यंत. किती सरळ न चुकता
अंधारातही रंग
जाणवतो.
गावाला गेलेल्या बायकोच्या
आठवणीत मग जिनाही दिसत नाही...नसतो.
सायकल चाचपून असल्याची
खात्री करून परत जिना
चढता चढता
मधेच किती अचानक दिवे आलेत
झोपायच्या पलंगापर्यंत किती थेट
अन् त्यावर सर्द नीरव झोपलेली
सर्वस्वी निष्पाप मुलं चेहरा घेऊन
पहुडतात तशी
तिचे डोळे तसेच मिटलेले
तिला पत्ताच नाही मधे
कधी किती तरी वेळ दिवे गेलेत ते
मघाशी,
आपण तरी कुठे जाण ठेवतो
दिव्यांची
चालू असताना...असतो.
डोळे उघडे ठेवून दिवे जातानाच
त्यांची चाहूल लागू देतात
आपल्या सताड हाती अंधार ठेवून
किंवा पुस्तकात बोट

ग्रंथालय ठाणे
२६२६
दा. क्र. २३९९०
७।११।८४
ग्रंथ शाखा स्थळ

## पाठमोरा

स्वप्नील डोळ्यांनी ओझावला चेहरा
न् खोलवर रुजू घातलेले
तुझे पाय
निरखता निरखता
वारा ओघळून पडला
पाऊस पागोळला
थेंब थेंब थेंबला
अंगावर झुरुमुरु  निःस्तब्ध

वादळी रात्र उरकून
पहाटधुकं मुरलं

मी तो विळखा उकलून उठलो
तुझे पैसे चुकते केले पायऱ्या उतरलो
अन्
पहाटधुक्यात विरलो
पाठमोरा.

## आवतण

अमाप ऐकून आहे तुझा संदर्भ

अवतरलास कधी तरी
विणून हजारो सूर्यजाळी
गजाआड बंदिस्त
तरी मुक्त उरलास
अणुरेणूंत अतिसूक्ष्म कधी
तर कधी डोळे दिपवलेस सूर्य झाकाळून
आणि झालास चालता
पुन्हा यायचं आश्वासन देऊन

कधीतरी डोळे दिपवलेस
तेव्हाचा बसलाय माणूस
दवडून डोळे
माणूस ओळखेना माणूस
तिकडे वेध घेताहेत तत्त्वाचा
तत्त्वज्ञ शोधतोय स्वत्व इकडे
अस्तित्व गमावून

आज चंद्र साकळलाय
उद्या सूर्य झाकाळेल
पुन्हा दिपतील डोळे
जमून सगळी मांदियाळी
एका विकल्प रेषेवर
करेल उदोउदो : माणसाने सूर्य जिंकला
माणसाने सूर्य झाकला
डोळे दिपले

पण तू कुठाय पहायला
हा सगळा सोहळा
कधीचा झालास चालता
परते येण्याचं आश्वासन देऊन.

आता येऽ
असेल हिम्मत तरच परत ये
मी आवतण देतोय
कारण तुझा धर्मच काय
सर्वच बुडवायची व्याख्या
आता पुरी उमजली आहे
ये.

अभंग

॥ ज्याने त्याने जपावीत
ज्याची त्याची इंद्रिये
पापाचा पहारेकरी
होऊ नये ॥

चौतीस

## हे अनेक हात उंचावलेले

हे अनेक हात उंचावलेले
निरभ्र आकाश तोलून
झडलेल्या बोटांनी-बिनदिक्कत
उन्हापावसात
वाऱ्याला न जुमानता

समजावताहेत वारंवार...
ह्याचा मूलस्रोतच
ओसाड माळांना पाऊसपाणी

आणि
वनचारी टोळयांचे हात, भटकणारे
प्रत्येक गावकुसाबाहेर वाळीत टाकलेले
...इथे सुसह्य झालेले आकाश

## आहे हे सारे

आहे हे सारे द्रवरूप
मी आता पाण्यासाठी तडफडतोय
पाणी द्रवरूप
घन ते सारं मिथ्याच
वायूचं रूपांतर द्रवरूपात होतं
संतांपासून आपण म्हणतो
मायेचा ओलावा—
तो ओलावाच जीवनाला कारण.

## गंज

ही खोली.
हे झाड.

ही खोली हे झाड
इथे दिसणार नाही
सजीव हालचालही
वातावरणावर हळूहळू गंज चढतोय

हा गंज चढतोय
तेव्हाच : मुळं शोषू लागलीयत माती
वठू लागल्यात फांद्या भिंतभेदी न् अशांत
सूर्य गिळू केला तर :
पडतील पानं वितळून पंख मिटून
आता पुन्हा झडली पानं उचलून
मिरवायला हाती त्राण नाही.
दिलं दान घेतलं दान
आता देण्याची दानत नाही
सढळ हातांवर आता गंज चढतोय.

वारा असेल तिथं शब्द वाहतात
इथं खांद्यावरचा पक्षीच फांदीवर गोठलाय
त्याला वाहण्याचं भान नाही
सजीव हालचाल आता दिसणार नाही
कारण प्रकाशावर गंज चढतोय.

फक्त
दिसायचंच तर तुला दिसेल
दृश्यावर हळूहळू गंज चढतोय.

## टी-एम-एच-च्या पोर्चमधून

टी-एम-एच-च्या पोर्चमधून
आत येताच
बाहेरून तुमच्याकडे पाहणारे
ओढून पाहत असतात डोळ्यांपुढे
चौकट
मृत्यूची म्हणा हवं तर.
तेव्हाही अजिवात हलायचं नसतं.
इथे कुठेही जागा सोडून
हलायचं नसतं

स्कॅनिंगच्या सरकत्या डोळ्यांखाली
पडून रहा
हळू
कोबाल्ट फोकसखाली निपचित
हलू नका
डॉक्टरची वाट पाहताना
आयसोटोप घेताना...

थोडं हललात तरी
चौकट तशीच राहते...पण
चित्र बिघडतं.
चित्र बिघडून चालत नाही
इथं.

टी-एम-एच-च्या पोर्चमधून बाहेर पडताना
पाठमोरे...तुम्ही कितीही हला
मागून पाहणारे चौकटीत बंद करीत असतात
चौकटीत निश्चित, निश्चल करून टाकत असतात
पुन्हा पोर्चमधून आत येईपर्यंत.
मी तर बाप्पा
हलणार फिरणार
खेकड्यांच्या नांग्या
तुटेपर्यंत

# तुमच्या तिरडीची लांबी-रुंदी

तुमच्या तिरडीची लांबी-रुंदी
माझ्या तुझ्या तिरडीची लांबी-रुंदी
तशी ठरूनच जाते आधीपासूनच
मनोमन तयार आपल्या इतरांच्या तिरड्या
सरळसोट एकाच मापाच्या
स्वतःचं माप तेवढं तद्दन विसरून

पाठीशी सतत बाळगून
जी डोळ्यांना कधी दिसत नाही

वास्तविक अजूनही कॅमोफ्लेज करून
दडवून ठेवलेत
अश्मयुगीन हत्यारांचं अवशेष
पण स्वतःच कर्फ्यू जारी करून
शमीची झाड कोणी चढू धजत नाही

पिंडदानाच्या वेळी कावळा शिवला
की जो तो मोकळा
आपापल्या तर्पणाला !

मग सिनेमे नाटकं
तमाशे महेफिली
एखाद्या अशाच
सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग
समभाग...भाग भाग भागणं...
किंवा डावं उजवं राजकारण
नाहीच जमलं काही
तर 'आत्मा अमर आहे'ची गोळी चढवूनही
माझं अमुक होणं तमुक होणं
माझं गर्दीत मिसळणं कधी संपत नाही.

तुमच्या तिरडीची लांबी-रुदी...

# लोक रस्त्यावरून चाललेत

लोक रस्त्यावरून चाललेत.
नतमस्तक.
प्रेतयात्रा चालली आहे.
प्रेतांची यात्रा.
निःशब्द.
शब्दांचे अर्थ...अर्थहीन भावना
शेजारून चालणाऱ्याविषयी शंका घेताहेत.
आता मशिनगनचा खडखडाट बंद
बधीर सर्व इंद्रियं
स्पर्श गंध ध्वनी दृष्टी
दारं, खिडक्या, मोहल्ले, दुकानं बंद.
बेबंद सारे. इतस्ततः फक्त नरपशूंची
पाशवी वस्ती. कुठे खुंटीवरच टांगलेली
रक्तरंजित विवस्त्र वस्त्रं
नातीगोती भूत होऊन पसार
आसऱ्याला निवारा शोधा
घरांपेक्षा सुरक्षित दोन गज जागा
घराघरात शोध गंजलेल्या शस्त्राकरता
शस्त्रागाराचं बंद दार आजवर कधी
उघडलंच नाही
विद्रोहाने आकार कधी घेतलाच नाही
दाराशीच टांगलेली पिंजऱ्यातली मैनेची चीत्कार
निःशब्दता कापत गेली जेव्हा
अंगणातल्या गुलाब रोपावर रांगड्या बुटांचे
ठसे उमटले
तेव्हा विद्रोहात साकारली मुक्तिसेना
तेव्हा मी पहात होतो
लाखोंच्या हृदयात ग्रेनेड ठासलेला
विस्फोटक नेत्र
न् करोडो रिते हात मरणास्त्राहून क्रूर
बनत चाललेले.

## अपरात्र

कोण कशाला जागवील ?
मीच जागा झालो त्या रात्री
जेव्हा दिवे विझलेत सारे

जवळ डोळे गेलेली
शेकोटी एकुलती
तीत विवरभर शापदग्ध माणुसकी
कृत्रिम थंडावा होऊन पहुडलीय

अन् दोनेक रातांधळी कुत्री
रडताहेत आसपास तेव्हा
मी जागा झालो त्या रात्री

तशात शेजारचा बरळला झोपेत :

या निशा सर्वभूतांना तस्यां जागर्ति संयमी
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः

तेव्हा
मी चाचपडलं
तर काहीच नव्हतं
ऐकलं ते नव्हतंच नव्हतं
चाचपडून ऐकलं
तर काहीच नव्हतं

मग मीही झोपी गेलो
पुनरपी जाग येईस्तंवर
त्या तशा अपरात्री

## एक प्रवास : जॅक प्रिवर्टला

एखादा स्टँड.
एक 'रांगेत उभे रहा'ची पाटी,
नसलेली एक रांग.
एक कंडक्टर. एखादी ओळख. पसा.
एक तिकीट. एक ड्रायव्हर. एकच जागा
किंवा दोन पाय.
शेजारी एक बाई
दोनसुद्धा चालतात
किंवा एक पुरुष
तेही नसेल तर, नसलेलं, रडकं एक मूल.
चार चाकं. एक रस्ता.
दर मैलागणिक एक दगड—मोटा
अधेमधे सात—लहान...
एक घाट दोन बाऱ्या
एखादी डोंगरओळ पुष्कळ निवडुंग
पण एकच एक रानफूल

पिवळं धम्म.                मधे
एकदोन स्टँड. एक मूत्री हक्काची
तीत तीन भिंतींवर मूत्री-वाङ्मय.
पुढे
एकदोन विनंती.
एक भांडण. स्टँडवर एक कप चहा,
(दारू एखाद्या मालट्रकच्या प्रवासात)
एक घंटी 'बंद'ची
दोनदा तीच घंटी 'चालू'ची किंवा उलट.
मधे एकदोन नद्या. एक ओढा.
त्यावर एक पूल किंवा एक फरशी.
त्यावरनं एका वेळी एकच गाडी जाणार-येणार.
पूर्वीच झालेला ट्रक ॲक्सिडेंट,
एखादा किस्सा. एक डुलकी.
शेवटी एक स्टँड. जाग आल्यावर
एक हमाल किंवा दोन हात
एक टांगा किंवा दोन टांगा.
अन्
एक-
-दम एक घर आपलं नसलेलं.

## बाजार/२१-१-६६

आजच्या बुभुक्षितांच्या प्रतारणा
आठवतात
केळाच्या सालावरती जवळीक
पाय पडल्यावर सुटते.
बेभान सुटलेल्यांवर वाराही पडतो
स्वतः आत्मिक होऊन.
सुचायला हवं ते
सुचून सुचवतात
ताजमहालवर कोरलेले स्वस्तिकातले वाद.
काही तुमचे काही आमचे
अन्
गुरुदत्तांची
आत्मवादग्रस्त हत्या आत्मक्षितीची.
सुचवून सुचवतात
माझ्या एकाग्र घावाचं वर्म ओळखल्यावर
मनाची सात्त्विक होऊ झाल्यानंतर
श्रमिक भावना
मगच मी जागा होतो
जागेपणी जागा असून
ह्या भर बाजारात
जवळ असेल ते विकून झाल्यावर
नसेल ते विकत झाल्यावर
भर बाजारात...

## डोळ्यांच्या काचा

डोळ्यांच्या काचा
काचांच्या खाचा होतात
डोळ्यांना स्वप्नांचे महारोग जडताना

डोळे उघडेच असतात सताड सदासर्वदा

पापण्यांच्या उघडझोपेत
बदलतात स्वप्ने कळतनकळत
स्वप्नांतच सफल सकल संकल्प
तिथे आपोआपच प्राप्त होते
विक्षिप्त प्रतिक्षिप्तता श्वासोच्छ्वासाइतकी

अन्
एक वेळ
तिला फुटल्या फांद्या
फांद्यांना पाने
पानांत फूल
(मी फूल तोडलं शेपटीला बांधलं)
फुलांना फळांचा पूर
त्यात बुडाली अट्ठा विश्वं
आपण मात्र तरलो
शेपटीला बांधलेल्या फुलाला धरून...

किंवा
पितरांचे नेसून पीतांबर पवित्र झालो...

किंवा
माझं म्हणणं तुला समजलं त्याला उमजलं
अशी उकलतात स्वप्नं कळतनकळत
धाग्याधाग्यानं धग विरत जाते कशी
आतल्या आत त्याचा पत्ताच लागत नाही...
वेगळेच असतात वास्तवाचे सगळे कायदेकानून
कधीतरी सरणावर सरण्याचं आश्वासन देऊन

डोळ्यांच्या काचा...काचांच्या खाचा होतात
डोळ्यांना स्वप्नांचे महारोग जडताना

## आपलं सर्व काही पंचवार्षिक

आपलं सर्व काही पंचवार्षिक

आपली निवेदनं पंचवार्षिक,
निर्वाचनं पंचवार्षिक,
निर्धारणं पंचवार्षिक ।।
आपली लोकशाही पंचवार्षिक ।।

आपलं नियमन
निरसन
नियोजनं पंचवार्षिक ।।
आपली लोकशाही पंचवार्षिक ।।

आपली निरोधनं पंचवार्षिक
निर्गमनं पंचवार्षिक
निलंबनं पंचवार्षिक.

आपली ही लोकशाही
निरंकार निराकार

अपना सबकुछ पंचवार्षिक
गरीबी और गरीबोंका निर्मूलन
पचवार्षिक
निष्कारण पंचवार्षिक...

**सेहेचाळीस**

## चांद्रयान सूत्र

चांद्रयानाच्या सहेतुक प्रदक्षिणा
पृथ्वीकक्ष होऊन,
काचेगणिक बदलते नक्षी, तद्वत दिश
अनिर्बंध अंतरा गात लक्षावधी
पेंगुळ गाणे
पांगुळ गाडे.

त्रिगणात्मक यत्र-शब्द
त्रिगुणात्मक गणयंत्र (प्रक्षित),
यंत्रगणांचा शब्द-मंत्र,
यंत्रांनाच कळलेला.
कललेली भ्रमणवाट
न उकललेली भ्रम-गाठ.
वैज्ञानिक उपपत्ती
ही तो ज्ञानीयांची व्युत्पत्ती
पारत्रिक आपत्ती
चंद्रालागी.

हे, यानस्थ गणयंत्रांनो, जा
जाताना हे ध्यानी असो द्या
एक सूत्र : प्रत्येकी
दि वर्ल्ड वॉज टू स्मॉल
टु अंडरस्टॅण्ड मी
ॲण्ड आय ॲम टू स्मॉल
टु अंडरस्टॅण्ड इट
प्रत्येकी
पिसारा फुलवू नका,
पसारा फुलवू नका,
स्मरणात ठेवा इथलं मरण, हे जग
प्रत्येकी
पितृवनात जागा दोन गज
प्रत्येकी

## खूणगाठ

माझं हस्तलाघव माहीताय ना
माझ्या मनाच्या इंद्रियांना

स्वत्वाची जाण सरून गेल्यावरची
माझी स्थिती न् कृती शुद्ध होऊन
राहते नंतर
ह्या कोषात
ओवलेल्या प्राक्तनावर विश्वासून
शक्य खूणगाठ दोहींची बसवलेली
पीळ पाडते
ह्या विशुद्ध
जगाकडे डोळस पाठ केली म्हणजे
वर देवादिकांची गर्दी ओठाळते.

नवनाथांतली इंद्राची कला-बैरागी
अन् मोर होऊन नाथांची फसवणूक
त्याच आम्रवृक्षा खाले
मी धजितो हे जाणे
रक्तातले नवनारायण पेरल्यावर
उगवताती जागोजागे
ज्यांना पतित म्हणतो आपण
अशाच फक्त
हे सगंळ पोथीत

एरवी कलियुग ह्यावर पापी होऊन बसलंय
आपलेच आपल्यातले आपल्याला पापी म्हणून
पुण्यवान ठरताहेत.

ही खुळी खूणगाठ दोहोंची
तीच ती ह्या कोषबीजात
तरणाऱ्या ज्वालामुखीत
अतिसंथ दडून बसलीयेय
अशी वाया जाऊन टाळतेय
तुला पापी म्हणणारी संख्य उत्पत्ती

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः

# सहस्रावधी हातांनी

सहस्रावधी हातांनी एकमेका विळखे घालू या
हृदयांची धडधड ऐकू द्या
कालप्रवाच्या जखमा भरभरून वाहू द्या
रक्त एकमेकात मिसळून
सारं सारं विसरून...धर्माची बंधनं.

संतापानं दातखिळ बसू द्या
कानठळ्या बसणाऱ्या आरोळ्यांनी
फुटू द्यात तावदानं खिडक्यांची
मुकेले आपल्या पोटातले सिंहनाद
भाकरीच्या तुकड्याचं दर्शन स्वप्नपहाट होऊ द्या.

सूर्यफुलातून उमलू द्या कोवळी कच्ची
(इथली हवा वर क्रांतीची हवा)
नंग्याने नाचू या पावसात मुसळधार

डाक्क्याच्या रस्तोरस्ती
जिथल्या डोंगरात पुनर्मलीन
कडेकपारीत नालेलव्हाळ्यात पुनर्जन्म घेऊन
बांगला देशच्या
कचरापेटीतून
महापुरांनी आसऱ्यातून
लवलवत्या अग्निज्वाळांच्या जिव्हा
होऊन रणचंडी क्रांतीच्या

धुळीतून पुन्हा उठू द्यात
मरणातून
जुनी भुतं पुन्हा देशात जागू द्या
आणि एक प्रचंड हास्य
हाडं वितळवणारं
मुक्तीच्या संग्रामाच्या शंखध्वनीसारखं

## स्थिती

इथे स्थितीला दार नसतं
असतं तटस्थ तळवर
खाली आधार गप्पगार
अवतीभवती अवकाशभार
अशा स्थितीला नसतं दार

अशा स्थितीला वाटा नसतात
अलीकडचं दिसत नसतं
पलीकडे अंधारवाटा
(पलीकडे जर असल्याच वाटा
तर वाटांनाही फुटतो फाटा)
या स्थितीला नसतात वाटा

अशा स्थितीत आधार नसतो
जिथे देवच झालाय स्वर्गवासी
अथवा तीर्थातीर्थावर स्थापनापन्न
घडवायचीत नवी मूल्यं
करायचंय मूल्यमापन
हे सगळं आपलंच आपण

कितीक दिवस राहणार असा
तिष्ठत उभा ताटकळत
नाळ तुटताच नाती तुटतात
इतक्या अधर सुटतो आधार
अशा स्थितीत नसतो आधार

इथे स्थितीला अगतिक गती
सहा ऋतू दहा दिशा
समोर न् भविष्याचा धावता वसा
इतका डाव सरळ असतो
फक्त स्थितीला पर्याय नसतो

२४८२८
२३९९७
ग्रंथसंग्रहालय ठाणे
REFBK-0023117
REFBK-0023117

## हे अतर्क्य

हे अतर्क्य भविष्य
अनंत विश्वप्राय आवर्तन
ही पृथ्वी सूर्यमाला श्वेतगंगा
अन् भिरभिर
भिरभिर
हे अनंत प्रकाशवर्षीय अंतर राखून
भिरभिरते तेजोगोल
हा अथांग विश्वपोत
तुझा
माझा
सगळ्यांचा जन्ममृत्यू
सारंच अपघाताने ओतप्रोत
हे सगळ्यांचे फक्त जाण्याचेच जुळणारे संकेत
ज्याने जाणायला शिकवलेत,
अन् मोठं
मी विमनस्क समुद्रमध्य
समुच्चयात एकाकी मी
क्षणोक्षणी क्षण वर्तमानी अंतर्धान पावतोय
ही जाणीव
न् फक्त
पुनश्चश्ची घटनांचा अर्थ लावत बसलो
एवढंच
त्यानं माझ्या हाती ठेवलंय

